महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम या संवर्गात मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा - २०१७ अन्वये शिफारस प्राप्त पात्र उमेदवाराला पदस्थापना देण्याबाबत.
श्रीम.रोहिणी दत्तात्रय नांद्रे.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण विभाग

शासन आदेश क्रमांक : विभाप ३३१७/ई-१२९७१३२/प्रशा-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ०५ ऑगस्ट, २०२६.

वाचा:-१.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१४४२(अ)/मशिसेमविप/२०१७/२४,दि.०४.०२.२०२६.
२.आयुक्त(शिक्षण) कार्यालयाचे पत्र क्र.आशिका/आस्था १०६/म.बं./२०२६, दि.१७.०३.२०२६.
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धुळे यांचे पत्र क्र.धुजिप/शिक्षण/चौकशी/१३८/२०२६/७७९, दि.२९.०५.२०२६

शासन आदेश-

महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशासन शाखा) मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदाकरीता घेण्यात आलेल्या मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या श्रीम.रोहिणी दत्तात्रय नांद्रे यांना उपशिक्षणाधिकारी व तत्सम या पदावर (वेतन पे बॅड रु. एस-१७ : ४७६००-१५११००) या वेतनसंरचनेत नियुक्ती देण्यात येत असून, खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी त्यांना पदस्थापना देण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	महसूल विभाग वाटप नियमानुसार मिळणारा महसूल विभाग	पदस्थापना
(१)	(२)	(३)	(४)
१	श्रीम. रोहिणी दत्तात्रय नांद्रे	नाशिक	उपशिक्षणाधिकारी (योजना), जि.प.नंदूरबार.

२. सदर नियुक्ती ही मा. जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे येथे दाखल विशेष खटला क्र. ६८/२०२६ या न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९.०५.२०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात आली आहे.

४. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने संबंधित अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

५. संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेली पदस्थापना सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक १४.०७.२०२१ मधील विभागीय संवर्ग वाटपाच्या तरतूदीनुसार करण्यात आली आहे.

६. संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांस पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच, संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत पदस्थापनेच्या पदावर रुजू व्हावे व संबंधित अधिकारी रुजू झाल्याबाबतचा अहवाल आयुक्त (शिक्षण) यांनी शासनास सादर करावा.

७. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०८०५१७३६१७४२४९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

Digitally signed by MOHINUDDIN B TASHILDAR
Date: 2026.08.05 17:37:21 +05'30'

(मो.बा.ताशिलदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा . मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
७. मा . उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
८. मा . मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
९. मा . राज्यमंत्री (शालेय शिक्षण / क्रीडा) यांचे खाजगी सचिव.
१०. प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक
११.आयुक्त (शिक्षण) , महाराष्ट्र राज्य , पुणे
१२.राज्य प्रकल्प संचालक , महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद , चर्नीरोड , मुंबई
१३. सहसचिव / उपसचिव (विद्यार्थी विकास / शाळा व्यवस्थापन / शिक्षक शिक्षकेतर/समन्वय / अर्थसंकल्प / क्रीडा) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय , मुंबई
१४. सर्व शिक्षण संचालक

१५.अध्यक्ष , माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , महाराष्ट्र राज्य , पुणे.
१६. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
१७.संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१८.संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / योजना)
१९.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
२०. संबंधित अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक / माध्यमिक)
२१. संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)
२२.सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२३.निवड नस्ती/प्रशा -२.